महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०४ वे | दिनांक : १८/०७/२०२६ | वार : शनिवार

## अजितदादांची इच्छा पूर्ण करण्यात त्यांच्या पक्षाला रस नाही - सुप्रिया सुळे



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घेतलेली भेट, आणि त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विलीनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी आज नवी दिल्लीत या संपूर्ण प्रकरणावर अत्यंत भावनिक आणि तितकीच ठाम प्रतिक्रिया दिली आहे. "माझ्या भावाची जी शेवटची इच्छा होती, त्या गोष्टीला आम्ही आता आमच्या मनात आणि संघटनेत पूर्णविराम दिला आहे. अजितदादांची इच्छा पूर्ण करण्यात त्यांच्या पक्षाला रस नाही," अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

नवी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर उपोषणाला बसलेले पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांची खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट घेतली. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विलीनीकरणाच्या विषयावर अत्यंत संवेदनशीलपणे भाष्य केले: सुप्रिया सुळे म्हणाल्या, "माझा भाऊ आज राहिलेला नाही. त्यामुळे माझ्या भावाबद्दल आणि तेव्हा झालेल्या चर्चेबद्दल आता आम्ही पूर्णविराम दिला आहे. माझ्या भावाला जाऊन आता पाच महिने झाले आहेत. आम्ही एक कुटुंब म्हणून या दु:खातून कुठेतरी सावरण्याचा प्रयत्न करत आहोत. दोन्ही पक्ष एकत्र यावेत आणि सर्वांनी मिळून गुण्यागोविंदाने राज्य व देशाची सेवा करावी, ही माझ्या भावाची शेवटची इच्छा होती. ती पूर्ण करण्याची आमची इच्छा दादा असतानाही होती आणि दादा गेल्यावरही होती. पण, आता समोरच्या बाजूने तशी कोणतीही भावना किंवा प्रतिसाद दिसत नाही."

अजित पवारांच्या मृत्यूनंतर समोरच्या गटाने घेतलेल्या भूमिकेबद्दल सुप्रिया सुळे यांनी तीव्र नाराजी आणि दु:ख व्यक्त केले. त्या म्हणाल्या, "ज्या दिवशी अजितदादांचे निधन झाले, त्या दिवशी आमच्या काही नेत्यांनी दादांची ही शेवटची इच्छा जाहीरपणे बोलून दाखवली होती. मात्र, समोरच्या बाजूच्या नेत्यांनी 'अशी कोणतीही चर्चा झालीच नव्हती' असे म्हणत तो दावा फेटाळून लावला. ते ऐकून आम्हाला कुटुंबाला आणि सहकाऱ्यांना प्रचंड दु:ख आणि वेदना झाल्या होत्या."हे बोलताना त्या म्हणाल्या, "तो प्रस्ताव प्रत्यक्ष माझ्या भावाचा होता. त्यामुळे त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आमचे प्रामाणिक प्रयत्न होते. पण जेव्हा मला जाणवले की, समोरचे नेते दादांची इच्छा पूर्ण करण्यास अनुकूल किंवा रास्त नाहीत, तेव्हा आम्ही तो विषय त्याच दिवशी संपवून टाकला. आम्ही अत्यंत स्वाभिमानी लोक आहोत. त्यामुळे आता आम्ही तो विषय मागे सारून पुन्हा एकदा पूर्ण ताकदीने राज्य आणि देशाच्या सेवेसाठी कामाला लागलो आहोत."

## संभाजीनगर-इचलकरंजी बसला भीषण आग



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर–इचलकरंजी एसटी बसला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली. बसमध्ये ३८ प्रवासी प्रवास करत होते. मात्र चालकाचे प्रसंगावधान आणि बाजूने जाणाऱ्या कारमधील नागरिकांच्या सतर्कतेमुळे सर्व प्रवाशांना वेळेत बसमधून बाहेर काढण्यात यश आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

ही घटना छत्रपती संभाजीनगर-बीड महामार्गावरील पिंपळगाव पांढरी फाटा परिसरात, गोदावरी हॉटेलजवळ सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. सकाळी ८ वाजता छत्रपती संभाजीनगरहून इचलकरंजीकडे निघालेली एसटी बस पंढरपूरच्या वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांसह प्रवाशांना घेऊन जात होती.

यावेळी चालकाने कोणतीही घाबरगुंडी न उडवता बस तातडीने रस्त्याच्या कडेला थांबवली. चालक, वाहक आणि प्रवाशांच्या सहकार्याने अवघ्या काही क्षणांत सर्व ३८ प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

प्रवासी खाली उतरल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. काही वेळातच बस पूर्णपणे जळून खाक झाली. बस पेटल्याचे दृश्य पाहून परिसरात एकच खळबळ उडाली.

या बसमधील काही प्रवासी पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघाले होते. वेळेत सर्वांना बाहेर काढल्यामुळे मोठा अनर्थ टळला. काही क्षणांचा उशीर झाला असता तर भीषण दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आमदार म्हणजे काय समजता? बैठकीची लिंक न मिळाल्याने भास्कर जाधव भडकले



**मुंबई :** आपल्या कडक स्वभावासाठी आणि सभागृहातील चौफेर आक्रमक शैलीसाठी नेहमीच चर्चेत राहणारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांचा संताप आता एका शासकीय बैठकीत पाहायला मिळाला आहे. रत्नागिरी येथे आयोजित 'दिशा' आणि 'रस्ता सुरक्षा' समितीच्या ऑनलाईन बैठकीची लिंक वेळेत न मिळाल्याने संतप्त झालेल्या भास्कर जाधव यांनी थेट जिल्हा प्रशासनाला धारेवर धरले, तर बैठकीचे अध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनाही ऑनलाईन बैठकीतच खडे बोल सुनावले.

रत्नागिरी-रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी येथे 'दिशा' आणि 'रस्ता सुरक्षा' समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने सर्व सदस्यांना दूरदृश्य प्रणालीची लिंक पाठवणे आवश्यक होते.

अधिकृत वेळापत्रकानुसार ही बैठक दुपारी 12 वाजता सुरू होणार होती. मात्र, प्रशासनाकडून आमदार भास्कर जाधव यांना वेळेत व्हीसी लिंकच पाठवण्यात आली नाही. दुपारी पावणेदोन वाजेपर्यंत लिंक न मिळाल्यामुळे भास्कर जाधव यांना वाट पाहावी लागली. या दीड-दोन तासांच्या कालावधीत मुख्य असलेली 'दिशा समिती'ची बैठक संपली देखील होती.

अखेर दुपारी पावणेदोन वाजण्याच्या सुमारास जेव्हा 'रस्ता सुरक्षा समिती'ची बैठक सुरू झाली, तेव्हा कुठे आमदार भास्कर जाधव यांना लिंक मिळाली. ऑनलाईन जॉईन होताच जाधव यांचा पारा चढला आणि त्यांनी प्रशासनाच्या हलगर्जीपणावर तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला.

"आमदार म्हणजे तुम्ही काय समजता? आम्हाला बैठक आहे हे कळवण्याचा किंवा वेळेत लिंक पाठवण्याचा साधा शिष्टाचारही प्रशासनाला ठाऊक नाही का? ही नेमकी कसली कार्यपद्धती सुरू आहे?" असा जळजळीत सवाल त्यांनी थेट निवासी जिल्हाधिकाऱ्यांना विचारला.

जिल्हाधिकाऱ्यांना सुनावल्यानंतर त्यांनी आपला मोर्चा थेट बैठकीचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्याकडे वळवला. एका लोकप्रतिनिधीला अशा प्रकारे बैठकीपासून वंचित ठेवणे हा प्रशासकीय निष्काळजीपणाचा कळस असल्याची टीका करत त्यांनी या संपूर्ण हलगर्जीपणाचा जाब विचारला.

काही दिवसांपूर्वीच विधिमंडळ अधिवेशनात आणि जाहीर सभांमध्ये आपल्या आक्रमक विधानांमुळे भास्कर जाधव चर्चेत राहिले होते. विधानसभा अध्यक्षांविषयी केलेल्या एका विधानावरून मोठा वादही निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर शासकीय बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरल्याने पुन्हा एकदा त्यांच्या आक्रमकतेची चर्चा रंगली आहे.

दुसरीकडे, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी नुकतीच आमदार भास्कर जाधव यांच्या संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली होती. या अनपेक्षित भेटीनंतर आता कोकणच्या आणि विशेषत: रत्नागिरीच्या राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जुलै २०२६


## वसुंधरेला 'डॅमेज' करणारे प्लास्टिकचे पॅकेजिंग




आजकाल स्वीटमार्टमधील चमचमीत मिठाई, रंगीबेरंगी सुकामेवा, फळे आणि इतर खाद्यपदार्थ पारदर्शक व वजनाने हलक्या प्लास्टिक बॉक्समध्ये पॅक केलेले असतात. या आकर्षक पॅकेजिंगमुळे अन्नपदार्थ दिसायला सुरेख दिसतातच सोबत हाताळायला सोपे आणि वाहून नेण्यासाठी सुटसुटीत वाटतात. धूळ, माश्या आणि मानवी स्पर्शापासून अन्न सुरक्षित राहत असल्याने ग्राहकांना ही पद्धत सोयीची वाटते, तर व्यापाऱ्यांना साठवणूक आणि विक्रीसाठी (डिस्प्ले) ती फायदेशीर वाटते.परंतु, या तथाकथित 'सोयी'मुळे पर्यावरणाची मोठी किंमत चुकवावी लागत आहे, ही किंमत इतकी भयानक आहे की त्याची कल्पना करणेही कठीण आहे. नुकताच या रिकाम्या बॉक्सेसची विल्हेवाट लावताना मला एक विदारक अनुभव आला, ज्यातून हे कटू वास्तव समोर आले.मी हे प्लास्टिक बॉक्स फेकून न देता, रिसायकलिंगसाठी (पुनर्वापरासाठी) जावेत या उद्देशाने काळजीपूर्वक साठवून ठेवले होते. जेव्हा एक पोतभर बॉक्सेस गोळा झाले, तेव्हा त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी मी एका भंगार खरेदीदाराला (स्क्रॅप डीलर) बोलावले. पण त्याने हा कचरा घेण्यास स्पष्ट नकार दिला. मी त्याला म्हणालो, "मला पैसे देऊ नकोस बाबा, अगदी फुकट घेऊन जा!" त्यावर तो म्हणाला, "हे भंगार कचऱ्यात फेकून द्या. हे प्लास्टिक कोणीही विकत घेत नाही, मग मी तरी ते कशाला घेऊ?" मला आलेला हा अनुभव केवळ माझ्यापुरता मर्यादित नाही.हा अनुभव जळगाव असो की संपूर्ण महाराष्ट्र, प्रत्येक नागरिकाला दररोज येत असतो. रोज गावागावांतून हजारो किलो निव्वळ बॉक्सेसचा कचरा निर्माण होतो आणि अखेर हा कचरा गाड्यांमधून तो थेट डम्पिंग ग्राउंडवर पोहोचवला जातो.भंगारवाल्याने कचरा घेण्यास नकार का दिला? याचा शोध मी घेतला असता काही महत्त्वाची तांत्रिक आणि आर्थिक कारणे मला सांगण्यात आली. त्यातील पहिले कारण म्हणजे हे बॉक्स PET (Polyethylene Terephthalate) किंवा PS (Polystyrene)अशा अत्यंत हलक्या दर्जाच्या प्लास्टिकपासून बनवले जातात. दुसरे, संपूर्ण पोतभर बॉक्स गोळा केले, तरी त्यांचे वजन अवघे काही ग्रॅम भरते त्यामुळे हा व्यवहार आर्थिकदृष्ट्या न परवडणारा आहे. तिसरे, हे हलके प्लास्टिक वितळवून त्यावर प्रक्रिया करणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत नाही.नवीन प्लास्टिक तयार करण्यापेक्षा या कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया (Recycle) करणे अधिक महाग पडते.चौथे कारण म्हणजे मिठाई किंवा अन्य तेलकट खाद्यपदार्थांमुळे हे बॉक्स दूषित होतात. ते धुवून स्वच्छ करणे आणि त्यानंतर त्यांच्यावर प्रक्रिया करणे भंगार व्यावसायिकांना परवडत नसते. या कारणांमुळे हे प्लास्टिक रिसायकल न होता वर्षानुवर्षे जमिनीत गाडले जाते किंवा उघड्यावर जाळले जाते; ज्यामुळे हवा, पाणी आणि मातीचे प्रचंड प्रदूषण होत आहे.यावर तातडीने उपाय शोधणे खूप गरजेचे आहे. या भूमिकेतून मी जेव्हा यावर उपाय काय? याचा विचार करू लागलो तेव्हा माझ्या लक्षात आले की या गंभीर समस्येचा विचार आता उत्पादक, शासन, विक्रेते यांनी एकत्रितरीत्या केला पाहिजे आणि आपण नागरिकांनी सुद्धा याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. तसेच केवळ "प्लास्टिक वापरू नका, ते घातक आहे" असा उपदेश करून भागणार नाही, तर यासाठी धोरणात्मक आणि वैज्ञानिक पातळीवर खालील ठोस पावले उचलण्याची गरज आहे. यासाठी प्रथम शासनाने प्लास्टिकला स्वस्त आणि सक्षम पर्याय शोधण्यासाठी तातडीने विशेष 'संशोधन आणि विकास निधी' (R&D Fund) जाहीर करून तो उपलब्ध करून दिला पाहिजे. तसेच शास्त्रज्ञ व स्टार्टअप्सना यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. मका, उसाची चिपाडे (Bagasse), महत्त्वाचे म्हणजे बांबू आणि इतर कृषी कचऱ्यापासून विघटनशील (Compostable) पॅकेजिंग साहित्याची निर्मिती करून ते सवलतीच्या दरात बाजारात उपलब्ध करून दिले पाहिजे. यासोबत जे उत्पादक किंवा ब्रँड्स अशा प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर करतात, त्यांच्यावरच हा कचरा पुन्हा गोळा करण्याची आणि त्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्याची कायदेशीर जबाबदारी निश्चित केली पाहिजे.माझा अनुभव सांगतो की, जर आपण आज या समस्येकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात आपल्या शहरांभोवती केवळ प्लास्टिक बॉक्सेसचे डोंगर उभे राहिलेले दिसतील. प्लास्टिक कचरा हटवण्याची जबाबदारी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत किंवा कचरा वेचकांची स्वीकारून हा प्रश्न सुटणारा नाही तर यासाठी वैज्ञानिक पर्याय शोधण्याची शासकीय इच्छाशक्ती आणि प्लास्टिकचा वापर नाकारण्याची नागरिकांची सजगता या दोन्ही गोष्टी एकत्र येणे गरजेचे आहे. तरच आपण या 'प्लास्टिकच्या भयानक संकटा'पासून आपल्या वसुंधरेचे रक्षण करू शकू.

- राजेंद्र गाडगीळ

## रुपाली शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त मतिमंद बालगृहातील मुलांना शालेय साहित्याचे वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** एकुरगावाडी, ता. उमरगा येथील ज्ञानदेव शिक्षण प्रसारक मंडळ, कदेर संचलित तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ मुलांचे बालगृह येथे व्ही.व्ही.ए. फाऊंडेशनच्या संचालिका सौ. रुपालीताई शिवाजी शिंदे यांचा ४९ वा वाढदिवस अत्यंत साधेपणाने परंतु आदर्शवत पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत बालगृहातील विशेष मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत त्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत निरंकारी मंडळाच्या सौ. मीराताई मोटे होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्राध्यापिका सौ. विजयाताई बेलकेरी, विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, उमरगा तालुका ग्राहक पंचायतचे संघटक धनराज शिंदे, मुख्याध्यापक गोविंद शिंदे, भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयातील सेवानिवृत्त प्रादेशिक व्यवस्थापक डॉ. शिवाजी शिंदे, व्ही.व्ही.ए. फाऊंडेशनच्या सदस्या ऐश्वर्या शिंदे, योगेश पांचाळ, सूर्यकांत कावळे, पद्मावती शिंदे, सारिका कटके, सुलभा कटके आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात केक कापून आणि शिवाजी शिंदे व सौ. रुपाली शिंदे यांचा सपत्नीक सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर बालगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रा. विजया बेलकेरी, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. महेश मोटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल शिंदे दाम्पत्याचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात मीराताई मोटे यांनी या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. या उपक्रमासाठी राजेंद्र कटके, रेवण कटके, वैभव कटके, गोविंद कटके, रोहन शिंदे आदींनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर जाधव तर आभार गोविंद शिंदे यांनी मानले. या प्रसंगी परिसरातील नागरिक व बालगृहाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.O अनाथाश्रमातील मुलांसोबत अनुभवला मायेचा ओलावा; स्नेहाच्या भेटीने विद्यार्थ्यांचे चेहरे फुलले :माणुसकीच्या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपताना अनाथ आश्रमातील मुलांसोबत काही क्षण घालवून त्यांना मायेचा आधार देण्याचा उपक्रम नुकताच पार पडला. तालुक्यातील एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ मुलांचे बालगृह व शाळा येथे मान्यवर आणि दानशूर व्यक्तींच्या वतीने सदिच्छा भेट देण्यात आली.या भेटीदरम्यान, आश्रमवासी मुलांसाठी एक वेळच्या भोजनाचे आयोजन करण्यात आली होती. पोटभर जेवण आणि मिळणाऱ्या आपुलकीच्या प्रेमामुळे मुलांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले. केवळ जेवणच नाही, तर या मुलांशी मनमोकळा संवाद साधताना त्यांच्यातील जिद्द आणि निरागसता अनुभवायला मिळाली. विद्यार्थ्यांनी आपल्या भावना बोलून दाखवतानाच, त्यांनी आपल्या विविध कला आणि कौशल्यांतून बनवलेल्या विविध साहित्यकृतींचे प्रदर्शनही उपस्थितांना दाखवले. त्यांच्या या कल्पकतेचे सर्वांनी कौतुक केले.याप्रसंगी आश्रमवासी विद्यार्थ्यांनी बनविलेले पुष्पगुच्छ देऊन उपस्थित पाहुण्यांचा सत्कार केला. विशेष म्हणजे, पाहुणे घरी आल्यानंतर जसा आनंद होतो, तसाच आनंद येथील विद्यार्थ्यांना आम्हाला पाहून झाला होता. मुलांच्या चेहऱ्यावरील हा आनंद आमच्यासाठी सर्वात मोठी देणगी आहे, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. या सदिच्छा भेटीमुळे मुलांमध्ये एक नवा उत्साह संचारला असून, त्यांना समाजाचा एक भाग असल्याचा दिलासा मिळाला आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जुलै २०२६


## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडीच्या नवीन इमारतीची मागणी; गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी येथील जुन्या शाळेच्या इमारती अत्यंत मोडकळीस आल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या धोकादायक इमारती तातडीने पाडून त्यांच्या जागी नवीन, सुरक्षित व सुसज्ज शाळेची इमारत बांधण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व पालकांच्या वतीने गटशिक्षणाधिकारी मॅडम (पंचायत समिती खुलताबाद) यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शाळेच्या जुन्या इमारतीच्या भिंतींना तडे गेले असून छताचीही दयनीय अवस्था आहे. भिंती पडल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना जीव धोक्यात घालावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याने कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत वर्ग आहेत विद्यार्थी संख्या ही १५१ आहे विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य फक्त १ वर्गखोली चांगली आहे.यावेळी म.न.से चे जिल्हा अध्यक्ष राजु घोरपडे त्यांचे सहकारी जालिंदर गायकवाड यांनी शाळेची पाहणी करून शाळेची अवस्था पाहीली आणि गावकऱ्यांना भेटून गटशिक्षणाधिकारी श्रीमती श्रद्धा ताटे मॅडम यांना फोनद्वारे कळवले आणी गटशिक्षणाधिकारी यांनी तात्काळ शाळेला भेट देवून शाळेच्या समस्येची दखल घेत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.ग्रामस्थ,पालक व शाळा व्यवस्थापन समितीने शासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून जुनी इमारत तातडीने पाडून नवीन शाळेची इमारत मंजूर करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. मागणी करतांना शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्षिका वंदना मेंगाळ,रंगनाथ मेंगाळ,बाळु मधे पुनम मेंगाळ,बबन हातवारे ,सनिराम गावंडे, सोमनाथ मेंगाळ,गुलाब बांगारे, राजेंद्र मेंगाळ, प्रल्हाद मेंगाळ,नवनाथ अगिवाले,रंगनाथ मधे आदि उपस्थित होते.

## येऊ दे रे दया तुला!

येरे येरे तू पावसा,
वाट तुझीच पाहतो.
डोळे माझे शिणले रे,
कसे दूर तू राहतो. १

नभांगणी दूर दूर,
दिसतच नाही ढग.
विझणार कसे सांग,
काळया मातीचे रे धग. २

रोप कोवळे पाहाते,
वाट पाऊस येण्याची
आहे वेळ रोपासाठी,
गुट्टी अमृत देण्याची. ३

विनवणी मेघराजा,
हात जोडूनी करतो.
बाप तुझ्या विश्वासाने,
शेती बियाणे पेरतो. ४

येऊ दे रे दया तुला,
रोप सुकून जाईल.
थेंब पडता शेतात,
गीत तुझेच गाईल. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## पंढरीची वारी

वारकऱ्यांची पाऊले
पंढरीच्या वाटी
श्रध्देने भेटी
विठूराया

पंढरीची वारी
अहंकार तोडी
अमृताची गोडी
अभंगाला

रिंगण सोहळा
टाळांचा गजर
विठूचा जागर
रात्रभर

नाही भेदभाव
नाही जातपात
एकतेची ज्योत
पंढरपूरी

भजन कीर्तन
चंद्रभागेच्या तीरी
एकतेची वारी
आषाढीला



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**






## छत्रपती संभाजीनगरात शिक्षण महाउत्सव

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** एम. एच. सी.ई.टी 2026 परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी डी एस एम एस टीम च्या वतीने "महा टॉपर्स डी एस एम एस टीम - महा उत्सव" या भव्य गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशाने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यास माजी शिक्षण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर एम. के. देशमुख हे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर येथील सहसचिव शिक्षण तज्ञ डॉ.उल्हास शिऊरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ज्यांनी आत्तापर्यंत एम. एच. सी.ई.टी 2026 परीक्षेत हजारो विद्यार्थीयांना मार्गदर्शन करून विशेष गुणवत्ता यादीत आणले आहे असे महाराष्ट्रातील ख्यातनाम तथा फिजिक्स ग्यान चे संचालक प्रा.मुकेश नायक, दिनेश सर लाइव्ह स्टडी चे संचालक प्रा.दिनेश गुप्ता, मुंबई ,ऑल अबाऊट केमेस्ट्रीचे संचालक प्रा.सोविंद यादव, बायो स्टडी चे संचालक प्रा.सौरव गाडगे यांचे खास मोफत मार्गदर्शन असणार आहे.यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली हा भव्य सोहळा पार पडत आहे. तरी या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी व पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.सदर कार्यक्रम शनिवार, 18 जुलै 2026, शनिवार रोजी दुपारी 12:00 ते 4 :00 वाजेपर्यंत,संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर. या ठिकाणी पार पडणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र भरातून एम.एच.टी.सी. ई .टी. परीक्षेत गुणवत्ता प्राप्त मिळालेली आहे असे विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जुलै २०२६


## सामाजिक क्षेत्रात ज्यांनी आयुष्याचं समर्पण केलं, अशा कार्यकर्त्यांनी साठी नंतर नेमकं काय करावं

मित्रांनो आज जरा वेगळा विषय घेऊन तुमच्यासमोर ठेवण्याचा विचार करतो आहे.मनुष्याच्या आयुष्यातील साठ वर्षे हा शेवट नसून नव्या सामाजिक जबाबदारीची सुरुवात असते. या वयात व्यक्तीने आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिलेले असतात. यश, अपयश, संघर्ष, नाती, समाज आणि जीवन यांचे सखोल ज्ञान त्याला प्राप्त झालेले असते. हा अनुभव स्वतःपुरता न ठेवता समाजाच्या हितासाठी वापरणे, हीच खरी जीवनाची सार्थकता आहे.सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी साठीनंतर पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धीच्या मागे न लागता समाजाला सक्षम करण्याचे कार्य हाती घ्यावे. आपल्या अनुभवाच्या बळावर तरुणांना योग्य दिशा देणे, स्वयंसेवक तयार करणे, नव्या नेतृत्वाला संधी देणे आणि समाजात सकारात्मक विचारांची पेरणी करणे ही त्यांची सर्वात मोठी जबाबदारी आहे.या वयात गावोगावी फिरून पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, वृक्षलागवड, व्यसनमुक्ती, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सलोखा यांसारख्या विषयांवर जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजाला केवळ आर्थिक मदतीची गरज नसते; त्याला योग्य विचार, मार्गदर्शन आणि प्रेरणाही तितकीच आवश्यक असते.साठीनंतर प्रत्येक अनुभवी सामाजिक कार्यकर्त्याने किमान दहा पंधरा तरुण सामाजिक कार्यकर्ते घडविण्याचा संकल्प करावा. स्वतःपेक्षा अधिक सक्षम नेतृत्व निर्माण करणारी व्यक्तीच खऱ्या अर्थाने यशस्वी समाजसेवक ठरते. आपण केलेल्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचला, तरच समाजकार्य सातत्याने पुढे जात राहील.याचबरोबर स्वतःचे अनुभव, चुका, यशोगाथा आणि शिकवण पुस्तके, लेख, व्याख्याने किंवा डिजिटल माध्यमांतून जतन करावी. पुढील पिढीला हा अनुभव प्रेरणा आणि मार्गदर्शन देईल. समाजासाठी दिलेला अनुभव हा कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान असतो.साठीनंतर स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निरोगी शरीर आणि शांत मन असेल तर समाजसेवा अधिक प्रभावीपणे करता येते. सेवा करताना कुटुंब, समाज आणि स्वतः यांच्यात समतोल राखणे आवश्यक आहे.खरे समाजकार्य म्हणजे प्रसिद्धी मिळवणे नव्हे, तर इतरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे होय. साठीनंतरचा प्रत्येक दिवस हा समाजाला काहीतरी परत देण्याची सुवर्णसंधी आहे. अनुभव, संयम, प्रामाणिकपणा आणि निःस्वार्थ सेवा या चार गोष्टींच्या बळावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हजारो लोकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करू शकतात."साठीनंतर निवृत्ती नव्हे, तर समाजासाठी नव्या पर्वाची सुरुवात होते. अनुभवाचे ज्ञान जेव्हा समाजाच्या सेवेत उतरते, तेव्हाच आयुष्य खऱ्या अर्थाने धन्य होते." खऱ्या अर्थाने साठी नंतरचं आयुष्य जगताना देशातल्या विशेष क्षेत्रांना भेटी द्या. लेख, अग्रलेख, काव्य यातून स्वतःचे अनुभव समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न करा. नवीन सामाजिक क्षेत्रातील पिढी घडवण्याचा प्रयत्न करा त्यांचं कौतुक करायला मागेपुढे कच खाऊ नका. त्यांच्या पाठीशी उभ रहा.आपण फाटके असलो तरीही त्यांना शब्दाची ऊर्जा द्या. नाहीरेंचा

असे । विठ्ठल सावळा तैसा
कनवळा । येवो आम्हा ॥१॥
नाथाहुनी नाथ । व्हावे विश्वनाथ ॥
अनाथांचा नाथ । व्हावे ऐसे ॥२॥
भूमिचे सांकडे । विठ्ठलाच्या पायी ।
समाज कारणी । देह लोगो ॥३॥

**- भूमिपुत्र वाघ**

## डॉ. सुधीर देवरे यांची दोन पुस्तके प्रकाशित

**सटाणा (नाशिक) :** येथील ज्येष्ठ साहित्यिक, भाषातज्ज्ञ, समीक्षक, संशोधक व भाषा, कला, लोकजीवन, लोकसंस्कृती यांचे अभ्यासक डॉ. सुधीर रा. देवरे यांची दोन पुस्तके शब्दालय प्रकाशनातर्फे नुकतीच अनौपचारिक पध्दतीने प्रकाशित झाली. या पुस्तकासह डॉ. सुधीर देवरे यांची आतापर्यंत ३९ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'संथ थंड संगाशी संग' (कवितासंग्रह) आणि 'आयता धनवरला नागोबा' (अहिराणी कथासंग्रह) अशी ही दोन पुस्तके आहेत. 'डंख व्यालेलं अवकाश', 'आदिम तालनं संगीत', 'कला आणि संस्कृती: एक समन्वय', 'अहिराणी लोकपरंपरा', 'अहिराणी गोत', 'अहिराणी वट्टा', अहिराणी लोकसंस्कृती', 'अहिराणीच्या निमित्ताने: भाषा', 'अहिराणी : भाषा, परंपरा आणि संस्कृती', 'भाषा : व्याप्ती आणि गंड', 'मी गोष्टीत मावत नाही', 'सोन्याची शाळा', 'गावदवंडी', 'डोंगरदेव', 'माणूस जेव्हा देव होतो', 'सहज उडत राहिलो', 'साहित्य : जाणिवा, मीमांसा आणि समीक्षा', 'आस्वाद: भावलेल्या कवितांचा', 'माणसं मरायची रांग', 'ब्लॉगच्या जाळ्यातून जग', 'सायकोचा तिढा', 'समीक्षा : साहित्य, कला आणि जीवन', 'पाय नसलेली माणसं', 'मानोसना शंभर वरीस', 'भाषा अहिराणी' आदी डॉ. सुधीर देवरे यांची या आधीची ग्रंथसंपदा आहे.

## मुरूम येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व अकरावी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरूम येथील कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात दि. १६ जुलै २०२६ रोजी बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये महाविद्यालयातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा तसेच इयत्ता अकरावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष श्री. त्र्यंबकराव (बाबा) इंगोले होते. यावेळी भारत शिक्षण संस्थेचे संचालक श्री. रामभाऊ इंगोले, प्रमुख मार्गदर्शक डॉ. सुवर्णा पाटील, माजी प्राचार्य श्री. डी. टी. इंगोले तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गोविंद इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच अकरावीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित अभ्यास, शिस्त आणि उच्च ध्येय ठेवून यश संपादन करण्याचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जुलै २०२६







## अनमुलवाड यांना लोकनायक पुरस्कार



**पूर्णा (प्रतिनिधी) :** दैनिक लोक युवाच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाराष्ट्र लोकनायक पुरस्कार 2026 साठी शिक्षण, साहित्य व समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल शिक्षक, साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल अनमुलवाड यांची निवड करण्यात आली आहे.अनमुलवाड यांनी शैक्षणिक क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवड निर्माण केली आहे. यासोबतच साहित्यलेखन, वाचन संस्कृतीचा प्रसार, सामाजिक जनजागृती आणि विविध उपक्रमांमधील सक्रिय सहभाग यामुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत निवड समितीने त्यांना या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवडले आहे.या निवडीबद्दल शिक्षण, साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, विद्यार्थी आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. हा सन्मान अधिक जबाबदारीने समाजहिताचे कार्य करण्याची प्रेरणा देणारा असल्याची भावना विठ्ठल अनमुलवाड यांनी व्यक्त केली.

## ज्ञानेश्वर विद्यालयात विद्यार्थी जनजागृती कार्यशाळा व महिला तक्रार निवारण समितीची बैठक संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात नुकतीच महिला तक्रार निवारण समितीची बैठक आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीषा केदार, हेड कॉन्स्टेबल पातोडे, हेड कॉन्स्टेबल वानखेडे आणि ज्येष्ठ शिक्षिका मंगल नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केल्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली.*महिला सुरक्षा आणि व्यसनमुक्तीवर मार्गदर्शन*यावेळी बोलताना सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीषा केदार यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. महिलांचा सन्मान राखणे आणि शालेय परिसरात विद्यार्थिनी व महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण कसे निर्माण करता येईल, यावर त्यांनी सविस्तर चर्चा केली. तसेच, वाढत्या व्यसनाधीनतेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची माहिती दिली. अशा प्रकारच्या गैरकृत्यांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास, ती न घाबरता तत्काळ संबंधित पोलीस स्टेशनला कळविण्याचे आवाहनही त्यांनी केले.*सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण सूचना*आजच्या काळात मोबाईल आणि इंटरनेटचा वापर वाढला असल्याने, ऑनलाइन जगात कसे वावरावे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सोशल मीडियाचा वापर करताना आणि मोबाईल हाताळताना विद्यार्थ्यांनी कोणती काळजी आणि सुरक्षितता बाळगावी, याविषयीच्या महत्त्वपूर्ण सूचना श्रीमती केदार यांनी दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगला सुलताने यांनी केले, तर उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांचे आभार आरती बिरोटे यांनी मानले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षितता आणि कायद्याबद्दल मोठी जागरूकता निर्माण झाली.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जुलै २०२६


## आई-बापाची सेवा

आई-बाप सोडले तर,बाकी सारे डुप्लिकेट असतात,गरज सरली की आपले म्हणणारे,क्षणातच परके होऊन जातात.

कितीही म्हणा तुम्ही "हे माझेच आहेत", तरी गुण-रंग दाखविल्याशिवाय राहत नाहीत,स्वार्थाच्या एका वादळात,नातीसुद्धा तुटून जातात.

आईने नऊ महिने उदरात जपलं,बाबांनी आयुष्य खपवून वाढवलं,स्वतःच्या प्रत्येक आनंदावर पाणी सोडून,लेकरांचं जग मात्र फुलवलं.

उपाशी राहून घास भरवला,रात्रभर जागून ताप उतरवला,आपलं दु:ख ओठांत दाबून,लेकरांच्या चेहऱ्यावर हसू फुलवलं.

मात्र तीच आई चार दिवस,मुलीकडे पाहुणी म्हणून गेली,"आईला मीच सांभाळते..." म्हणत,तिने जगभर त्याची जाहिरात केली.

अगं लेकी, इतकंच विसरलीस का?इतिहास सारा मागचा,तुला उभं करताना आईने,झिजवला होता प्रत्येक श्वास तिचा.

चार दिवसांच्या सेवेला,इतका गाजावाजा कशाला?आई-बापांच्या मायेवर,उपकाराचा शिक्का कशाला?

आई-बापांची माया म्हणजे माया,तिला शब्दांचा बाजार कशाला?जिथे प्रेम नि:स्वार्थ असतं,तिथे इतकी जाहिरात कशाला?

जग सगळं पाहत असतं,कोणीच आंधळं नसतं;घरात मायेचा दिवा विझलेला,आणि बाहेर उपदेशाचा उजेड कशाला?

ज्यांनी स्वतःच्या घरात,ज्येष्ठांचा मान कधीच जपला नाही,त्यांनी माणुसकीची प्रवचने देण्यात,मोठेपणा शोधू नये काही.

ज्यांच्या हातून वृद्धांना, पाण्याचा साधा घोटही मिळाला नाही,त्यांच्या ओठांवरचे तत्त्वज्ञान,लोकांच्या मनाला कधी भावत नाही.

सेवा ही बोलण्यात नसते,ती वागण्यात दिसली पाहिजे;आई-वडिलांच्या डोळ्यांतील समाधान,हेच खरे पुण्य ठरले पाहिजे.

उपकारांचा हिशेब नसतो,मायेचं मोल पैशात नसतं,आई-बापांच्या त्यागापुढे,संपूर्ण जगही फिकं पडतं.

धन-दौलत पुन्हा मिळेल,हरवलेलं वैभवही परतेल,पण आई-बाप एकदा गेले की,संपूर्ण आयुष्य रडत राहील.



**- डॉ बाळासाहेब लिहिणार**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## युवकांनी डिजिटल कौशल्य आत्मसात करणे ही काळाची गरज



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाच्या वतीने जागतिक युवा कौशल्य दिन साजरा करण्यात आला.हे कार्यक्रम महासंचालक एनसीसी कार्यालय दिल्ली यांच्या वतीने समाजसेवा आणि सामुदायिक विकास विभाग यांच्या वतीने युवक जनजागृती विषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ गिरीधर सोमवंशी यांनी मार्गदर्शन केले. प्राचीन कौशल्या सोबत आधुनिक युगातील कौशल्य यांच्या माध्यमातुन भारतीय युवकांची क्षमता,नविनकल्पना आणि आत्मविश्वासाला योग्य दिशा देणे गरजेचे आहे.आजचे युग हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित राहिलेले नाही.आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात, संगणक,तंत्रज्ञान , डिजीटल आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या युगात केवळ पदवी असणे पुरेसे नाही त्या शिक्षणासोबतच स्वतःच्या कौशल्यांमध्ये सातत्याने बदल करणे ही काळाची गरज बनली आहे.भारतासारख्या सर्वात जास्त तरुण लोकसंख्या असणाऱ्या देशात सर्वांना सरकारी नौकरी मिळणे शक्य नाही यासाठी कौशल्यपुरक युवा कौशल्यांचे शिक्षण घेणे गरजेचे आहे .आज स्किल इंडिया,डिजिटल इंडिया विविध केंद्र व राज्य शासनाच्या उपक्रमांद्वारे आपल्या देशातील तरुणांना विविध प्रकारच्या व्यवसायांचे आणि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाते .या संकल्पनेतून तरुणांना केवळ तांत्रिक शिक्षणच नव्हे, तर डिजिटल कौशल्ये आणि कल्पकता आत्मसात करण्याचा संदेश दिला जातो .हे ध्येय गाठण्यासाठी कौशल्य हेच आपले सर्वात मोठे शस्त्र आहे.शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान ,कला, हस्तकला,डिजिटल मार्केटिंग किंवा इलेक्ट्रीकल, मोठ्या कंपनी,उद्योग, व्यवसाय, शासकिय, खाजगी कार्यालय सर्वच क्षेत्रात आपण निपुण बनले पाहिजे. शिक्षा केवळ पदवी मिळवण्यापुरते मर्यादित न राहता,नवनवीन कौशल्य, आत्मनिर्भर होणे अगत्याचे आहे. यासाठी तरुणांनी डिजीटल कौशल्य शिक्षण घ्यावे असे आव्हान सोमवंशी यांनी केले .या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य संजय अस्वले यांनी भूषविले प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, आभार अर्जुन पाचंगे यानी केले .तसेच कार्यक्रमासाठी डॉ पदमाकर पिटले,डॉ विनोद देवरकर प्रा घंटे, प्रा म्हेत्रे व कॅडेटस,विद्यार्थी,प्राध्यापक, प्राध्यापिका उपस्थित होते .

## सुपर थर्टी इंग्रजी शाळेने केला अय्युब पठाण यांचा सत्कार




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** छत्रपती संभाजी नगर येथील हर्सुल टी पाईंट जवळील सुपर थर्टी इंग्रजी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक व संस्थेचे अध्यक्ष गणेश सोनवणे यांनी प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा शाल, श्रीफळ, व पुष्पहार देऊन यथोचित गौरव केला आहे. साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांची इयत्ता चौथीच्या वर्गाला " कौतुकाची थाप " हा पाठ संपूर्ण महाराष्ट्राच्या प्राथमिक शाळेत मराठीचे अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट झालेला असून, या अनुषंगाने सुपर थर्टी इंग्रजी शाळेचे संस्थापक तथा अध्यक्ष व मुख्याध्यापक गणेश सोनवणे अय्युब पठाण लोहगावकर यांना विशेष निमंत्रण पाठवून श्री.पठाण यांना सन्मानाने छत्रपती संभाजी नगर येथील हर्सल टी पाईंट जवळील सुपर थर्टी इंग्रजी शाळेत बोलवून सत्कार केला आहे. याप्रसंगी मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळे, मनोज खुटे, प्रदीप विखे, रमाकांत छडीदार सर आणि कवयित्री श्रीमती आशा डांगे मॅडम, वाहेद पठाण, मुदस्सर पठाण यांची या सत्काराच्या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी याप्रसंगी " कौतुकाची थाप " या पाठाचे प्रभावीपणे विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण केले आणि विद्यार्थी हे "कौतुकाची थाप" या पाठाच्या सादरीकरणाने मंत्रमुग्ध झाले होते. शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखकांनी समर्पक उत्तरे दिली. मुख्याध्यापक गणेश सोनवणे यांनी लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांना शुभेच्छा देऊन त्यांचा सन्मान करून पुढील साहित्य लेखनास शुभेच्छा दिले आहे. याप्रसंगी सुपर थर्टी इंग्रजी शाळेचे सर्व शिक्षक शिक्षिका हजर होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जुलै २०२६

# अण्णाभाऊ साठे : समतेचा ज्वलंत आवाज- डॉ. राजेंद्र बगाटे



१८ जुलै हा दिवस महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन पाळला जातो. हा दिवस केवळ एका साहित्यिकाच्या स्मरणाचा नसून समाजातील वंचित, पीडित, श्रमिक आणि उपेक्षित घटकांच्या अस्मितेला शब्द देणाऱ्या एका महान लोककलावंताला अभिवादन करण्याचा दिवस आहे. आपल्या लेखणीतून, शाहिरीतून आणि लोककलेतून जनसामान्यांच्या वेदना, संघर्ष, स्वाभिमान आणि समतेचा संदेश देणारे अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यविश्वातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी साहित्याला केवळ मनोरंजनाचे साधन न मानता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत जीवनाचा खरा स्पर्श, श्रमिकांचे वास्तव, अन्यायाविरुद्धचा विद्रोह आणि समतेची प्रखर जाणीव आढळते. म्हणूनच त्यांचे कार्य आजही समाजाला दिशा देणारे आणि प्रेरणा देणारे ठरते.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे मातंग समाजातील एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते. घरची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती, सामाजिक उपेक्षा आणि जातीय अन्याय यांचा अनुभव त्यांनी बालपणापासून घेतला. औपचारिक शिक्षण घेण्याची संधी त्यांना फारशी मिळाली नाही. परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण अल्पावधीतच थांबले. परंतु जीवन हीच त्यांची सर्वात मोठी शाळा ठरली. प्रत्यक्ष जीवनातील अनुभव, लोकजीवनाचे निरीक्षण, कष्टकरी समाजाचे दुःख आणि अन्यायाची जाणीव यांमधून त्यांनी स्वतःला घडविले. पुढे उदरनिर्वाहासाठी त्यांचे कुटुंब मुंबईत आले. त्या काळात मुंबई वेगाने औद्योगिक शहर म्हणून विकसित होत होती. गिरण्या, कारखाने आणि झोपडपट्ट्यांतील कठीण जीवन त्यांनी जवळून अनुभवले. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तवाची ताकद दिली.मुंबईतील जीवन हे त्यांच्या आयुष्यातील निर्णायक वळण ठरले. त्यांनी अनेक प्रकारची श्रमाची कामे केली. कधी हमाली, कधी बांधकामावरील मजुरी, तर कधी रस्त्यावर छोटीमोठी कामे करून त्यांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. श्रमाची प्रतिष्ठा आणि कष्टकरी माणसाच्या जीवनातील संघर्ष त्यांनी स्वतः अनुभवला असल्यामुळे त्यांच्या लेखणीत कृत्रिमता नव्हती. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक वर्गाचे जीवन अत्यंत जिवंतपणे उभे राहते. त्यांनी गरीब माणसाला दयेचा विषय न बनविता स्वाभिमानी आणि संघर्षशील व्यक्ती म्हणून साकारले.अण्णाभाऊ साठे यांच्यावर महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा खोल प्रभाव होता. समाजातील विषमता, जातिभेद, आर्थिक शोषण आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठविला. त्यांच्या मते साहित्य हे जनतेच्या जीवनाशी जोडलेले असले पाहिजे. समाजातील वास्तवापासून दूर असलेले साहित्य फार काळ टिकत नाही. म्हणून त्यांनी लोकभाषा, लोकसंस्कृती आणि लोकजीवन यांना आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते एक प्रभावी लोकशाहीर होते. त्यांनी पोवाडे, लावण्या, लोकनाट्य, वगनाट्य आणि शाहिरीच्या माध्यमातून सामाजिक जागृती घडवून आणली. त्यांच्या आवाजात जनतेच्या वेदना होत्या आणि त्यांच्या शब्दांत परिवर्तनाची ताकद होती. त्यांनी कलाकृतींना सामाजिक जबाबदारीची जोड दिली. त्यांच्या शाहिरीने हजारो कामगार, शेतकरी आणि सामान्य लोकांमध्ये स्वाभिमानाची भावना जागृत केली. त्यांच्या कार्यक्रमांना प्रचंड प्रतिसाद मिळत असे, कारण ते लोकांच्या मनातील भावना त्यांच्या भाषेत मांडत असत.मराठी साहित्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांनी तीसपेक्षा अधिक कादंबऱ्या, अनेक कथासंग्रह, पोवाडे, लावण्या, वगनाट्ये, प्रवासवर्णने आणि विविध प्रकारचे साहित्य निर्माण केले. त्यांच्या साहित्यामध्ये कल्पनारम्यता नसून जीवनाचे वास्तव आहे. त्यांनी समाजातील सर्वसामान्य माणसाचे जीवन केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या लेखनात अन्यायाविरुद्धचा संघर्ष, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, स्त्रियांचे प्रश्न, कामगारांचे जीवन, ग्रामीण वास्तव आणि दलित समाजाचे अनुभव प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत.त्यांची 'फकिरा' ही कादंबरी मराठी साहित्यातील मैलाचा दगड मानली जाते. या कादंबरीतील नायक फकिरा हा अन्यायाविरुद्ध लढणारा, स्वाभिमानी आणि समाजासाठी झटणारा व्यक्ती आहे. ही कादंबरी केवळ एका व्यक्तीची कथा नसून शोषित समाजाच्या सामूहिक संघर्षाचे प्रतीक आहे. या साहित्यकृतीला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार प्राप्त झाला. आजही 'फकिरा' ही सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि संघर्षाची प्रेरणादायी कादंबरी म्हणून अभ्यासली जाते.अण्णाभाऊ साठे यांच्या कथांमध्येही समाजातील वास्तव अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. झोपडपट्ट्यांतील जीवन, दारिद्र्य, बेरोजगारी, श्रमिकांचे प्रश्न, स्त्रियांचे दुःख, सामाजिक विषमता आणि मानवी नातेसंबंध यांचे त्यांनी अत्यंत संवेदनशील चित्रण केले. त्यांच्या कथांमधील पात्रे काल्पनिक वाटत नाहीत, तर ती आपल्या समाजातीलच माणसे वाटतात. त्यांच्या भाषेत कृत्रिम अलंकारिकता नसून सहजता आणि लोकभाषेची ताकद आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्य वाचकांपर्यंत सहज पोहोचले.स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही अत्यंत प्रगतिशील होता. समाजातील स्त्रियांचे शोषण, आर्थिक असुरक्षितता, सामाजिक अन्याय आणि त्यांची संघर्षशील वृत्ती त्यांनी अत्यंत वास्तववादी पद्धतीने मांडली. त्यांच्या साहित्यामधील स्त्री ही केवळ दुःख भोगणारी व्यक्ती नसून संकटांना धैर्याने सामोरी जाणारी आणि आत्मसन्मानाने जगणारी व्यक्ती आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार त्यांनी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांमधून मांडला.संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून मोठे योगदान दिले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जनजागृती करण्यामध्ये त्यांच्या पोवाड्यांनी आणि लोकगीतांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या शब्दांनी जनतेमध्ये उत्साह, आत्मविश्वास आणि लढाऊ वृत्ती निर्माण केली. मराठी अस्मिता, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक ऐक्य यांना बळकटी देण्याचे कार्य त्यांच्या साहित्याने केले.कामगार चळवळीशी त्यांचे नाते अत्यंत जवळचे होते. मुंबईतील गिरणी कामगार, बांधकाम मजूर, हातावर पोट असलेले श्रमिक आणि स्थलांतरित कामगार यांच्या प्रश्नांना त्यांनी आपल्या साहित्याचा विषय बनविले. श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि समाजातील संपत्तीवर सर्वांचा समान हक्क आहे, हा विचार त्यांच्या लेखनातून सातत्याने व्यक्त झाला. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ साहित्यिक न राहता सामाजिक चळवळीचे प्रभावी साधन बनले.अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेला सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनविले. तमाशा, पोवाडा आणि लोकनाट्य यांसारख्या लोककला प्रकारांना त्यांनी नवे सामाजिक भान दिले. पूर्वी केवळ मनोरंजनासाठी वापरल्या जाणाऱ्या या कलाप्रकारांद्वारे त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध प्रभावी संदेश दिला. त्यामुळे लोककलेला सामाजिक बांधिलकीची नवी दिशा मिळाली.त्यांच्या साहित्यामध्ये राष्ट्रप्रेम आणि मानवतावाद यांचाही प्रभाव दिसून येतो. भारतातील विविध जाती, धर्म आणि भाषांमधील लोकांनी परस्पर सन्मान, बंधुता आणि समतेच्या भावनेने जगले पाहिजे, हा त्यांचा ठाम विचार होता. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या द्वेषाला किंवा भेदभावाला कधीही पाठिंबा दिला नाही. मानवतेचे मूल्य हेच सर्वश्रेष्ठ असल्याचा संदेश त्यांनी सातत्याने दिला.अण्णाभाऊ साठे यांना सोव्हिएत रशियाला भेट देण्याची संधी मिळाली होती. त्या प्रवासामुळे त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली. त्यांनी तेथील सामाजिक व्यवस्था, श्रमिकांचे जीवन आणि विकास यांचा अभ्यास करून प्रवासवर्णनेही लिहिले. त्यांच्या साहित्यामध्ये जागतिक मानवतावादी दृष्टिकोन आणि श्रमिकांविषयीची आंतरराष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते.आजच्या काळात अण्णाभाऊ साठे यांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. आर्थिक विषमता, बेरोजगारी, सामाजिक भेदभाव, स्थलांतर, असंघटित कामगारांचे प्रश्न, स्त्रियांची सुरक्षितता आणि सामाजिक न्याय यांसारख्या समस्या आजही समाजासमोर आहेत. अशा वेळी समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा आणि मानवी सन्मान यांचा त्यांनी दिलेला संदेश अत्यंत समकालीन ठरतो. त्यांच्या साहित्याचा अभ्यास केल्यास समाजातील दुर्बल घटकांविषयी संवेदनशीलता निर्माण होते आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास अधिक दृढ होतो.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये भारतीय समाजजीवनाची जाणीव, सामाजिक उत्तरदायित्व आणि संविधानिक मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. त्यांच्या लेखनातून समावेशक समाज, सामाजिक न्याय आणि मानवी समानतेचे मूल्य प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते. म्हणूनच विविध विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांच्या साहित्याचा अभ्यास आजही महत्त्वाने केला जातो.अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन हा केवळ अभिवादनाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने समतेच्या मूल्यांचा स्वीकार करणे, जातीय आणि सामाजिक भेदभाव दूर करण्यासाठी प्रयत्न करणे, श्रमाला सन्मान देणे आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी संवेदनशील राहणे आवश्यक आहे. त्यांच्या साहित्याचे वाचन, संशोधन आणि प्रसार हीदेखील त्यांना खरी आदरांजली ठरेल.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या संघर्षमय जीवनातून सिद्ध केले की, प्रतिभा ही कोणत्याही जाती, वर्ग किंवा आर्थिक परिस्थितीची मक्तेदारी नसते. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी यांच्या बळावर माणूस इतिहास घडवू शकतो. त्यांनी स्वतः अनुभवलेल्या वेदनांना शब्द दिले, उपेक्षितांच्या संघर्षाला दिशा दिली आणि साहित्याला समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. म्हणूनच ते केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण मानवतेचे लोकशाहीर ठरतात.आज अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या कार्याचे स्मरण करताना त्यांच्या समतावादी विचारांना आपल्या आचरणात उतरविण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. संविधानाने दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात रुजविणे, श्रमिकांचा सन्मान करणे, वंचितांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि मानवी प्रतिष्ठेला सर्वोच्च स्थान देणे, हीच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या साहित्याचा प्रकाश येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील, सामाजिक परिवर्तनाचा मार्ग उजळत राहील आणि समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी सतत ऊर्जा देत राहील. अशा या महान लोकशाहीराला त्यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन.



**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत) ईमेल —**
**bagate.rajendra5@gmail.com**